**पीपीआयच्या वापराच्या अटी व शर्ती (इटझ कॅश कार्ड लिमिटेडद्वारे वितरीत भौतिक व अभासी स्वरूपातील उपांत्या बंद साधनाच्या सर्व विभिन्नता समाविष्ट पीपीआय)**

1. सदर प्रिपेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट (पीपीआय), प्रदान आणि जमाबंदी प्रणाली कायदा, 2007 आणि त्यातंर्गत निर्मित विनियमन, भारतामध्ये प्रि–पेड पेमेंट इन्स्ट्रुमेंट वितरण आणि प्रचालन (रिझर्व बँक) निर्देशन, 2009 (‘‘आरबीआय मार्गदर्शन) द्वारे संरक्षित आहे आणि तसेच पुन:विमोचन, पुन:प्रदान, उपयोग इत्यादीच्या संदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेद्वारे वेळो वेळी निर्गमित निर्देशन /सूचनांना अधिन आहे आणि इटझ कॅश कार्ड लि. (इटझकॅश) अशा परिस्थितीमध्ये पीपीआय धारकाची कोणतीही जबाबदारी धारण करीत नाही.
2. 18 वर्षांपेक्षा अधिक वयाची व्यक्लिला पीपीआयचा वापर करता येईल.
3. पीपीआयचा वापर उपयोगीता देयक आणि आवश्यक सेवांच्या पेमेंटसाठी करू शकता. गैर–उपयोगीता देयक किंवा गैर–आवश्यक सेवांच्या बाबातीत, आबीअयाद्वारे वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या केवायसी अनुपालनाच्या आवश्यकताना अधिन राहून पीपीआयचा वापर करता येईल. उपयोगीता देयक आणि आवश्यक सेवांच्या प्रदानाकरिता प्रिपेड कार्डचे कार्डचे कमाल मूल्य रु.20,000 आहे आणि केवायसी दस्तावेज सादर केल्यानंतर घेतलेल्या सर्व अतिरिक्त सेवांच्या बाबतीत रु.1,00,000 आहे.
4. तुमच्या कडून सादर करण्यात आलेल्या केवायसीचा उपयोग इटझकॅशद्वारे व्यवसायीक वापरासाठी केला जाऊ शकतो. तुम्ही याद्वारे याकरिता संमती दर्शविता (अ) इ–समाचारपत्र तसेच अन्या प्रस्ताव समाविष्ट अन्य संपर्क इत्यादी आणि (ब) इटझकॅशकडून तूमची माहिती प्रस्ताव आणि /किंवा माहिती पुरविण्यासाठी प्रयोजक / आणि /किंवा त्यांच्या संलग्न कंपन्याना देते.
5. तुम्ही याद्वारे विक्रेत्यांद्वारे संकेतस्थळावर नमूद उत्पादन / सेवांसाठी विहित विक्रेत्यांसोबत सर्व व्यवहाराकरिता पीपीआय वापरण्यास सहमत आहात आणि या उपरोक्त पीपीआयचा वापर करून कोणत्याही बेकायदेशिर कारण / कार्यासाठी उपयोग न करण्याची संमती दर्शविता. तुम्ही कोणत्याही बेकायदेशिर/गुन्हेगारी/हवाला/दहशतवादी कार्यवाहीमध्ये भाग घेणार नाही किंवा पक्ष होणार नाहीत.
6. इटझकॅश, कोणत्याही फसवणूक किंवा पीपीआयच्या दुरूपयोगाकरिता जबाबदार राहणार नाही आणि अशा कोणत्याही फसवणूक किंवा पीपीआयच्या दुरूपयोगामुळे उद्‌भवणाऱ्या सर्व मूल्य, आकार, दावे किंवा उत्तरदायित्वासाठी तुम्ह व्यक्तिश: जबाबदार असण्यास सहमत आहात.
7. तुम्ही याद्वारे घोषित करता आबीआयद्वारे वेळोवेळी प्रस्तुत परिपत्रकानुसार तुमचे नाव कोणत्याही वेळेस दहशतवादी व्यक्ति / संघटनांच्या यादीत संकलित नसेल.
8. पीपीआयचा उपयोग करून खरेदी केलेल्या/प्राप्त केलेल्या उत्पादन/खरेदी/माल किंवा सेवांच्या कोणत्याही दोषांसाठी इटझकॅश उत्तरदायि / जबाबदार राहणार नाही. पीपीआयचा उपयोग करून संकेतस्थळावरू खरेदी केलेल्या/प्राप्त केलेल्या उत्पादन / खरेदी/माल किंवा सेवां संबंधित कोणताही दावा किंवा विवाद नियुक्त विक्रेत्यांकडून सोडवून घ्यावा. इटझकॅश अशा परिस्थितीमध्ये पीपीआयधारकासाठी कोणतीही जबाबदार स्वीकारणार नाही.

9. नियक्त विक्रेत्यांकडे पीपीआयचा वापर करण्याकरिता इटझकॅश पेमेंट गेटवे सेवा शुल्क आकारू शकते. सदर शुल्क व्यवहारच्या वेळेस पेमेंट गेटवे पृष्ठावर प्रदर्शित करण्यात येईल किंवा त्या त्या वेळेस लागू असल्यानुसार संकेतस्थळावरील सुचिनूसार असेल.

10. जर काही,आरबीआयचे जर काही निर्देश असल्याशिवाय पीपीआयवर विमोचन किंवा पैसे काढण्यास अनुज्ञा नाही.

11. हे पीपीआय सक्रिय केल्याच्या तारखेपासून किंवा पहिल्या वापराच्या तारखेपासून, यापैकी जे नंतर होईल त्या तारखेपासून 4 वर्षांसाठी वैध आहे. समाप्तीच्या तारखेनंतर जर काही न वापरलेली शिल्लक बाकी राहील्यास ती आबीआय मार्गदर्शनानुसार जप्त करण्यात येईल.

12. सदर पीपीआयमधील मालमत्ता इटझकॅशच्या मालकीची आहे. आढळल्यास, कृपया ती इटझ कॅश कार्ड लिमिटेड यांना, टॉप 14 वा मजला, टाईम्स टॉवर, कमला सीटी, सेपती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई – 400013 येथे परत करा.

13. पीपीआय हरविल्यास किंवा गहाळ झाल्यात, इटझ कॅश यांना त्वरीत लेखी (पत्र/ई–मेल) कळवा. तसे केल्या पीपीआय ब्लॉक करण्यात येईल आणि या संबंधित विहित पध्दतीनुसार शिल्लक रकमेसह इटझकॅशद्वारे वेळोवेळी विहित केलेल्या नाममात्र आकावर इटझकॅशद्वारे नवीन पीपीआय वितरीत करण्यात येईल.

14. पीपीआयची नक्कलप्रत केल्यास ते रद्द करण्यास अधिन राहील.

15. परकीय चलनामध्ये पीपीआयचा वापर करता येणार नाही.केवळ भारतीय कायद्यांद्वारे संरक्षित व्यापाऱ्यांसोबत ऑनलाईन/ ऑन मोबाईल/ आयव्हीआरएस व्यवहाराकरिता पीपीआयचा वापर करू शकता.

16. कोणत्याही व्यवहाराकरिता एकदा पीपीआयचा उपयोग केल्यास तो पुन्हा मागे घेता येणार नाही.

17. पीपीआय अहस्तांतरणीय आहे.

18. इटझकॅशद्वारे कोणतेही कारण न दर्शविता कोणत्याही कारणासाठी पदसिध्द विक्रेत्यांच्या संकेतस्थळ / मोबाईल ॲप्लीकेशन/आयव्हीआरएसवर पीपीआयचा वापर कोणत्याही वेळेस नाकारण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.

19. तुमच्या नाव, टपाल पत्ता, ई–मेल पत्ता किंवा असा कोणताही बदल असल्यास, इटझकॅशच्या मागणीनुसार त्वरीत कळवा.

20. कोणत्याही विवादाच्या निराकरणासाठी, इटझकॅशने संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ‘‘ग्राह गाऱ्हाणी निवारण धोरणाची’’ रचना केली आहे, या पीपीआयच्या वापर संबंधित कोणत्याही व्यवहारामधून उद्भवणारे सर्व विवद या धोरणास अधिन असतील. पुढील कोणताही दावा संपूर्णत: मुंबई न्यायालयाच्या आधिकारीतेद्वारे संरक्षित राहील.

21. पीपीआयचा उपयोगरून केलेला कोणताही व्यवहार अमलात असलेल्या भारतीय कायद्यास अधिन असेल.

22. इटझकॅशद्वारे ग्राहकाला कोणतीही पूर्व सूचना /माहिती न देता या अटी व शर्तींमध्ये दुरूस्ती/फेरबदल/वगळणूक/ अंतर्भाव आणि सुधारणा करण्याच अधिकार राखून ठेवण्यात आला आहे.